# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०१ डिसेंबर, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800

✍: 7447744100 (PRO)


# सरकारी कामात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीस न्यायालयाने ठोठावली शिक्षा

पोलीस स्टेशन रामनगर हद्दीत फिर्यादी पोलीस अमंलदार हे कर्तव्यावर असतांना कर्तव्यात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीस १९/१२/२०२० रोजी **मा. श्री. मौदेकर सा., सह. सत्र न्यायाधीश क्र. ४ चंद्रपुर** यांनी कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

दिनांक १८/०८/२०१५ रोजी फिर्यादी पोलीस नाईक नामदेव गंगाधर पवार, वाहतुक शाखा चंद्रपुर हे प्रियदर्शनी चौकात आपले कर्तव्य बाजावित असतांना यातील **आरोपी नामे बादल किसन सहारे वय ४० रा. जुनोना चौक चंद्रपुर** याने तुम्ही माझ्या गाडीचे चालान का केले तुला पाहुन घेईल असे म्हणुन शिवीगाळ करून धमकी दिली. आणि फिर्यादी हे गणवेषात आहे असे माहित असुन सुध्दा आरोपीने धक्कामुक्की केली. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र. ४०९/२०१५ कलम ३५३,५०४,५०६ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा तपासात घेतल्यानंतर तपासी अधिकारी पोहवा. गंगाराम पेंढारकर ब.नं. ५५२ पोलीस स्टेशन रामनगर यांनी आरोपीस निष्पन्न करून आरोपीविरूध्द सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १९/१२/२०२० रोजी **आरोपी नामे बादल किसन सहारे वय ४० रा. जुनोना चौक चंद्रपुर** यास **कलम ३५३ भादंवि मध्ये २ महिने कारावासाची शिक्षा व ५००/—रू दंड, दंड न भरल्यास १५ दिवस कारावासाची शिक्षा मा. श्री. मौदेकर सा., सह. सत्र न्यायाधीश क्र. ४ चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. एस. आर. देगावार, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन **सफो. राजु सबळ**, पोलीस स्टेशन रामनगर यांनी काम पाहिले.

———————————————————————————————————————